6

महाराष्ट्र शासन

फोन नं.२६४७ ४८९२
टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.jdteromumbai.com

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.

क्र. २/विकामुं/तंशि/आस्था-२/२०२०/३३२६ दिनांक : - 6 NOV 2020

## कार्यालयीन आदेश :

पहा :
१. उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्र.जीईसी ३३९६/(७३७६)/ तांशि-१, दि.१०.४.१९९७.
२. शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही२०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दि.१२.०९.२०१६.
३. सामन्य प्रशासन विभागाची अधिसूचना दि.६.६.२०१७
४. सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ए/१६-ब, दि.२९.१२.२०१७
५. सामन्य प्रशासन विभागाची अधिसूचना दि.२१.२.२०१८
६. सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.४६७ए/१६-ब, दि.११.१०.२०१८
७. सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना दि.११ जून २०१९.
८. या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्रं.२/विकामुं/तंशि/आस्था(३)/२०२०/३०२०, दि. २१.१०.२०२०.

उपरोक्त क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन तसेच वरील संदर्भ क्र.३ व ४ मध्ये पदोन्नतीबाबत नमुद नियमांस अनुसरुन विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई हे खाली नमूद केलेल्या ग्रामिण संवर्गातील कर्मचाऱ्यांची त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या संस्थेत तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती करीत आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव, पदनाम व सद्यस्थितीत कार्यरत कार्यालय/ संस्थेचे नांव | पदोन्नतीचे पदनाम | पदोन्नतीने नियुक्ती केलेल्या संस्थेचे नांव | अभिप्राय/ संवर्ग |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. किरण कृष्णा पालव, शासकीय तंत्रनिकेतन, मालवण (वेतनसंरचना एस-६ १९९००-६३२००) | **लिपिक टंकलेखक स्तर एस-६-** (१९९००-६३२००) | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय रत्नागिरी येथिल रिक्त पदावर | **खुल्या प्रवर्गातुन पदोन्नती (ग्रामिण संवर्ग)** |

उपरोक्त पदोन्नत्या हया खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात येत आहेत.

वर नमूद केलेल्या कर्मचा-यांच्या पदोन्नत्या हया तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून करण्यात येत आहेत.

१. सदर पदोन्नत्याहया राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहेत.
२. सदर पदोन्नतीचे आदेश संस्थेने या कार्यालयाकडे उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांच्या आधारे, विविध सेवा जेष्ठता / शासन निर्णयातील तरतुदीनुसार निर्गमित केलेले आहेत. परंतु समितीच्या बैठकीत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या संदिग्ध माहितीमुळे किंवा माहितीच्या विश्लेषणात्मक आकलनातील संदिग्धतेमुळे चुकीने पदोन्नतीचे लाभ मिळाल्याचे / करण्यात आल्याचे कोणत्याही वेळी निदर्शनास आल्यास देण्यात आलेला पदोन्नतीचा लाभ पूर्वलक्षी प्रभावाने काढून घेण्यात येतील या अटीवर देण्यात येत आहे.

३. पदोन्नतीच्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत हजर होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना पदोन्नतीत स्वारस्य नाही असे समजून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीसाठी नंतरच्या कर्मचाऱ्याचा विचार केला जाईल.

४. पदोन्नतीमुळे संबंधीतांना वेतननिश्चिती बाबतचा विकल्प शासन निर्णय वित्त विभाग क्र.पीएंवाय/१०८२/ सीआर-११००(एक) एसईआर-३ दि.६/११/१९८४ मधील तरतुदीनुसार रुजू होण्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत कार्यालयास सादर करावा लागेल. ज्या कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेतंर्गत पदोन्नत पदाची वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्यांची पुनःश्च वेतननिश्चिती होणार नाही.

५. महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम, १९९९ नुसार त्यांनी सामान्या प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९.३.२००३ नुसार नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आत विहीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहित मुदतीपूर्वी विहित प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही तर उक्त कालावधी संपताच त्यांना सेवेत कायम करण्यात येणार नाही व याबाबत त्यांचे कोणतेही निवेदन विचारात घेतले जाणार नाही, अथवा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिली जाणार नाही. अथवा परिक्षा उत्तीर्ण होण्यास मुदतवाढ दिली जाणार नाही.

६. वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र.५७/२०१५/विसु-१, दि.१४.१.२०१६ नुसार उपरोक्त कर्मचाऱ्यांनी पदावर रुजू झाल्याच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीत मराठी ३० श.प्र.मि. / इंग्रजी ४० श.प्र.मि. वेगाचे शासनाचे विहित केलेले टंकलेखन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. विहित कालमर्यादेत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांना पदावनत करण्यात येईल.

७. त्यांची पदोन्नती ही त्यांच्या समाधानकारक कामाच्या अहवालावर चालू राहील, अन्यथा त्यांना पदावनत करण्यात येईल.

८. संबंधित कर्मचा-यांनी शासनाने निर्धारित केलेली मराठी/हिंदी परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.

९. उपरोक्त कर्मचा-यांनी पदोन्नती नाकारल्यास संदर्भाधीन दि.१२.०९.२०१६ च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या तरतुदी बंधनकारक राहतील.

१०. पदोन्नती नंतर भविष्यात कोणत्याही प्रशासकीय बाबी उद्‌भवल्यास त्यांना पदोन्नतीच्या पदावरुन पदावनत करण्यात येईल.

११. पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे नियत सेवानिवृत्तीचे वय शासन प्रचलित नियमानुसार ५८ वर्षाचे राहील.

वरील अटी व शर्ती मान्य असल्यास त्यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या पदावर हजर होतांना वरील अटी व शर्ती मान्य असल्याचे लेखी हमीपत्र लिहून देणे बंधनकारक राहिल.

(प्रमोद अ. नाईक)
**सहसंचालक,**
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई- ५१.

प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.

१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.
२. कोषागार/उपकोषागार अधिकारी, मालवण / रत्नागिरी (मानार्थ) (संस्थाप्रमुखांमार्फत)
३. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मालवण / शासकीय औषधनिमर्णशास्त्र महाविद्यालय रत्नागिरी
४. संबंधीत कर्मचारी (संस्थाप्रमुखांमार्फत)
५. निवड नस्ती.